# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२६

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### चंद्रपूर जिल्हा परिषद शाळांमधील प्राथमिक शिक्षकांची एकस्तर वेतनश्रेणी व प्रोत्साहन भत्ता थकबाकी देयके अदा करणेबाबत

**(१) २५९० (१८-०७-२०२५) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हा परिषद शाळांमधील प्राथमिक शिक्षकांना एक स्तर वेतनश्रेणी व १५ टक्के प्रोत्साहन भत्ता थकबाकी देयके अदा करणेसाठी शासनाकडून ६३ कोटी रुपये देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील शिक्षण विभागाच्या चुकीच्या धोरणामुळे हा निधी परत गेला असल्यामुळे येथील ३२५४ शिक्षकांना सदर लाभापासून वंचित रहावे लागले असल्याने सदरील शिक्षक आंदोलने करुन संताप व्यक्त करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने निधी परत जाण्यास कारणीभूत असलेल्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली तसेच निधीची तरतूद करुन सदरील जिल्हा परिषद शाळांतील प्राथमिक शिक्षकांना एकस्तर वेतनश्रेणी व १५ टक्के प्रोत्साहन भत्ता थकबाकी देयके अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (२९-०५-२०२६) :** (१), (२) व (३) शासनाकडून प्राप्त निधी परत जाण्यास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचे स्तरावर चौकशी समिती नेमण्यात आली आहे.

३२५४ शिक्षकांपैकी २९४० शिक्षकांची थकबाकी अदा करण्यात आली असून उर्वरीत ३१४ शिक्षकांची थकीत देयके शालेय शिक्षण विभागाकडून निधी प्राप्त होताच अदा करण्यात येतील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भंडारा जिल्ह्यातील साकोली तालुक्यामधील माजी मालगुजारी तलावांचे खोलीकरण व पुर्नजीवन करण्यासाठी आर्थिक तरतूद करण्याबाबत

**(२) २६२५ (१८-०७-२०२५) श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले : दिनांक १८ डिसेंबर, २०२४ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ११ मधील प्रश्न क्रमांक २४२८३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील साकोली तालुक्यात ५६५ पेक्षा अधिक माजी मालगुजारी तलावांची संख्या असून गेल्या काही वर्षापासून या तलावांच्या पुनर्जीवनाकडे दुर्लक्ष झाल्यामुळे या भागातील सिंचन क्षमता कमी झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तलावांचे खोलीकरण व पुनर्जीवन करण्यासाठी जलयुक्त शिवार योजना अथवा इतर योजनेतुन आर्थिक तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड (२४-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) भंडारा जिल्ह्यामध्ये साकोली तालुक्यात एकूण २४८ माजी मालगुजारी तलाव अस्तित्वात आहेत. त्यापैकी माजी मालगुजारी तलावांचे पुनरुज्जीवन व बळकटीकरण कार्यक्रम टप्पा-१ मध्ये ९३ तलावांची व जलयुक्त शिवार अभियान २.० योजनेंतर्गत १७ मा.मा.तलावांची दुरुस्ती कामे करण्यात आलेली आहेत.

टप्पा-२ मध्ये १९ मा.मा.तलावांची दुरुस्ती कामे व गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेंतर्गत १८ मा.मा.तलावांमधुन गाळ काढण्याची कामे प्रगतीत आहेत.

तसेच विभागाचा बृहत आराखडा प्रस्तावित असून प्राधान्यानुसार व निधी उपलब्धतेनुसार १०१ मा.मा.तलावांची दुरुस्ती टप्प्या-टप्प्याने करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील भूजल पुनर्भरण प्रकल्पाची गावपातळीवर अंमलबजावणी करुन नागरिकांचा सहभाग वाढविण्याबाबत

**(३) ३३४३ (१०-०७-२०२५) श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वॉटर डार्क झोन (पाण्याचा दुष्काळग्रस्त किंवा कमी पाणी असलेले क्षेत्र) भागांमध्ये अनेक तालुक्यांचा समावेश होत असून विशेषत: विदर्भातील कोणकोणत्या तालुक्यांचा समावेश या योजनेमध्ये आहे, तसेच राज्यातील वॉटर डार्क झोन (पाण्याचा दुष्काळग्रस्त किंवा कमी पाणी असलेले क्षेत्र) भागांमध्ये भूजल पुनर्भरणासाठी कोणत्या योजना राबविल्या जात असून या योजनांचा अद्यापपर्यंत किती गावांना लाभ झाला आहे याचा तपशिल सादर करण्यात आला आहे काय,

(२) असल्यास, जलतारा योजना आणि तापी नदी भूजल पुनर्भरण प्रकल्पाच्या प्रभावीपणे अंमलबजावणीसाठी तसेच भूजल पुनर्भरणासाठी गावपातळीवर अधिक प्रभावी उपाययोजना करण्यासाठी

शासनाने कोणते धोरण आखले आहे व त्यात शेतकरी व नागरिकांचा समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (२४-०२-२०२६) :** (१) सन २०२४ च्या पूर्ण केलेल्या भूजल मुल्यांकनानुसार विदर्भात खालील जिल्ह्यातील तालुक्यांचा समावेश अतिशोषित (डार्क झोन) वर्गवारीत आहे.

| अ.क्र. | जिल्हा | तालुका |
|---|---|---|
| १ | अमरावती | चांदुरबाजार |
| | | वरुड |
| २ | बुलढाणा | संग्रामपूर |
| | | जळगाव जा |

राज्यात जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत बळकटीकरणासाठी भूजल पुनर्भरणाच्या रिचार्ज शाफ्ट, रिचार्ज ट्रेंच, व रिचार्ज शाफ्ट कम रिचार्ज ट्रेंच या उपाययोजना राबविण्यात आल्या आहेत. सन २०२२-२३ व सन २०२३-२४ मध्ये एकूण २९९० गावांमध्ये यापैकी २८८१० उपाययोजना पूर्ण करण्यात आल्या आहेत.

नरेगा अंतर्गत राज्यात Natural Resources Management (NRM) अंतर्गत १८२ प्रकारची कामे घेतली जातात. त्यामध्ये Mission Water Conservation अंतर्गत राज्यातील १४ जिल्ह्यातील ७२ तालुक्यांचा समावेश आहे.
(२) महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना अंतर्गत राज्यात जलतारा (Recharge Pit) ची एकूण ६१०५ कामे घेण्यात आली असून त्यापैकी १०५६ कामे पूर्ण झाली आहेत.

जलसंपदा विभागामार्फत तापी खोरे महाकाय पुनर्भरण हि प्रस्तावित योजना महाराष्ट्र व मध्यप्रदेश राज्याची आंतरराज्य योजना आहे. सदर योजनेमुळे २,१३,७०६ हे. क्षेत्रास पुर्नभरणाद्वारे लाभ मिळणार आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर येथे जागतिक क्षमता केंद्र स्थापन करण्याबाबत

**(४) ४७१४ (१४-१२-२०२५) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र सरकारने गतवर्षी केंद्रीय अर्थसंकल्पात टीयर २ व टीयर ३ शहरांमध्ये जागतिक क्षमता केंद्राना (ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटरना) चालना देण्याची घोषणा करण्यात आली असून महाराष्ट्र जागतिक क्षमता केंद्र धोरणास राज्य मंत्रिमंडळाने मंजूरी दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील कोल्हापूर हे ऐतिहासिक व आर्थिक दृष्ट्या महत्त्वाचे शहर असून ते आयटी

उद्योग व ग्लोबल कंपन्यांसाठी तसेच इतर आधुनिक उद्योगांना प्रोत्साहन देण्याची क्षमता असल्यामुळे ते भविष्यात आर्थिक विकासासाठी एक महत्त्वाचे केंद्र बनू शकते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने टीयर २ व टीयर ३ शहरांमध्ये कोल्हापूर शहराचा समावेश करून येथे जागतिक क्षमता केंद्र (ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटरना) स्थापन करणे व कोल्हापूर, सांगली, सातारा या भागाला ग्लोबल इकॉनॉमिक्स झोन म्हणून विकसित करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२०-०४-२०२६) :** (१) केंद्र शासनाने संसदेत दिनांक ०१ फेब्रुवारी, २०२५ रोजी सादर केलेल्या केंद्रीय अर्थसंकल्प २०२५-२६ अंतर्गत उद्योन्मुख श्रेणी २ शहरांमध्ये जागतिक क्षमता केंद्रांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्यांना मार्गदर्शन म्हणून एक राष्ट्रीय चौकट तयार करुन यामध्ये प्रतिभा आणि पायाभूत सुविधांची उपलब्धता वाढविण्यासाठी, उप-विधी (Bylaws) सुधारणांची उभारणी करण्यासाठी आणि उद्योगांशी सहकार्यासाठी यंत्रणांसाठी उपाय सुचविण्याबाबत घोषणा करण्यात आलेली आहे.

राज्य मंत्रिमंडळाच्या दिनांक ३०/०९/२०२५ रोजीच्या बैठकीत महाराष्ट्र जागतिक क्षमता केंद्र धोरणास मान्यता प्रदान करण्यात आली असून त्याबाबतचा शासन निर्णय दिनांक ३/११/२०२५ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.
(२) कोल्हापूर शहराचे ऐतिहासिक व आर्थिक महत्व तसेच उपलब्ध औद्योगिक क्षमता लक्षात घेता, ते आयटी/सेवा व आधुनिक तंत्रज्ञानाधारित उद्योग वाढीसाठी अनुकूल शहर आहे.

जीसीसी/ जागतिक कंपन्यांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा, कुशल मनुष्यबळ उपलब्धता व कनेक्टीव्हीटी इ. च्या उपलब्धतेमुळे कोल्हापूर शहर भविष्यात आर्थिक विकासाचे महत्त्वाचे केंद्र बनण्याची क्षमता आहे.
(३) महाराष्ट्र जागतिक क्षमता केंद्र धोरण-२०२५ मध्ये नाशिक, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर यांसारख्या टियर-२ व टियर-३ शहरांना जागतिक क्षमता केंद्र परिसंस्थेत समाविष्ट करुन नवीन आर्थिक केंद्रे निर्माण करणे तसेच संतुलित व तंत्रज्ञानाधारित वाढ साध्य करण्याची तरतूद आहे.

कोल्हापूर-सांगली-सातारा हा भाग ग्लोबल इकॉनॉमिक झोन म्हणून विकसित करण्याबाबत सदर धोरणामध्ये तरतूद करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पंतप्रधान रोजगारनिर्मिती कार्यक्रमांतर्गत उद्योग स्थापनेसाठीचे प्रस्ताव सादरीकरण संकेतस्थळ बंद असल्याबाबत

**(५) ४७४३ (१७-१२-२०२५) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंतप्रधान रोजगारनिर्मिती कार्यक्रमाअंतर्गत उद्योग उभारण्यासाठी शासनाकडून आर्थिक साहाय्य दिले जाते. तथापि, सदर कार्यक्रमांतर्गत प्रस्ताव सादर करण्यासाठीचे संकेतस्थळ मार्च, २०२५ पासून बंद असल्यामुळे अनेक अर्जदारांना उद्योग स्थापनेसाठी प्रस्ताव नोंदणी करता येत नसल्याचे माहे ऑक्टोबर,

२०२५ मध्ये वा त्यादरम्याने निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रस्ताव सादर न झाल्यामुळे महाराष्ट्रातील उद्योजकांना रोजगारनिर्मितीच्या संधीपासून वंचित राहावे लागले असल्याने प्रस्ताव नोंदणी प्रक्रियेमध्ये निर्माण झालेल्या अडचणी दूर करण्यासाठी शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कार्यक्रमाअंतर्गत महाराष्ट्र राज्यातून एकूण किती प्रस्ताव प्राप्त झाले व त्यापैकी किती मंजूर झाले, त्याची जिल्हानिहाय माहिती देण्यात यावी तसेच सदर कार्यक्रम सुरळीत सुरू राहण्यासाठी केंद्र शासनाशी सातत्याने संपर्क साधून संकेतस्थळ तातडीने सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२४-०३-२०२६) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम ही योजना केंद्र शासनाच्या सूक्ष्म, लघु, मध्यम मंत्रालयाकडून दिनांक १५/०८/२००८ पासून राबविण्यात येत असून खादी व ग्रामोद्योग आयोग ही संस्था नोडल एजन्सी म्हणून काम करत आहे. तसेच राज्य शासनाच्या जिल्हा उद्योग केंद्र आणि महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग मंडळ यांच्यामार्फत सदर योजनेची राज्यामध्ये अंमलबजावणी करण्यात येत आहे. सन २०१६ पासून सदर योजनेची अंमलबजावणी संकेतस्थळाच्या माध्यमातून ऑनलाईन पोर्टलद्वारे करण्यात येत असून सदर संकेतस्थळ नियमित सुरू होते. तथापि, प्रलंबित अर्जाचा अनुशेष असल्याने नवीन अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया दिनांक १५/०४/२०२५ पासून तात्पुरती स्थगित करण्यात आली होती. सदर प्रक्रिया दिनांक २३/०६/२०२५ पासून पुन्हा सुरू करण्यात आल्याचे खादी व ग्रामोद्योग आयोग या नोडल एजन्सीद्वारे कळविण्यात आले आहे.
(२)सदरहू संकेतस्थळ तातडीने सुरू करणेबाबत उद्योग संचालनालयामार्फत खादी व ग्रामोद्योग आयोग या नोडल एजन्सीकडे विनंती करण्यात आलेली होती. त्यानुसार नवीन अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया दिनांक २३/०६/२०२५ पासून सुरू केलेली आहे.
(३) सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम या योजनेंतर्गत दिनांक ०५/०३/२०२६ पर्यंत राज्यातून एकूण १४२८९ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी २११५ अर्जांना बँकांकडून मंजुरी देण्यात आली आहे. सदरहू संकेतस्थळ तातडीने सुरू करणेबाबत उद्योग संचालनालयामार्फत केंद्र शासनाच्या सूक्ष्म, लघु, मध्यम मंत्रालयातंर्गत खादी व ग्रामोद्योग आयोग या नोडल एजन्सीकडे विनंती करण्यात आलेली होती. त्यानुसार नवीन अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया दिनांक २३/०६/२०२५ पासून सुरू करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामधील तांत्रिक आणि प्रशासकीय पदे रिक्त असल्याबाबत

**(६) ४७६४ (२२-१२-२०२५) श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सद्य:स्थितीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणात गट अ ते गट ड पर्यंतची अनेक तांत्रिक आणि प्रशासकीय पदे मंजूर असून त्यापैकी प्रवर्गनिहाय अनेक पदे रिक्त असून अभियंते आणि तांत्रिक कर्मचारी

उपलब्ध नसल्यामुळे राज्यातील अनेक पाणीपुरवठा योजनांची कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, अपुऱ्या मनुष्यबळामुळे प्रलंबित राहिलेल्या प्रकल्पांच्या खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने शासकीय निधीचा अपव्यय होत असून नागरिकांना आवश्यक सोयी सुविधा मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उक्त रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (०१-०६-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणात गट-अ ते गट-ड पर्यंतची तांत्रिक आणि प्रशासकीय एकूण २२४० पदे मंजूर आहेत. त्यापैकी ११९० पदे भरलेली असून १४५२ पदे रिक्त आहेत. मोठ्या प्रमाणात पदे रिक्त असल्याने दैनंदिन कार्यालयीन कामकाजावर परिणाम होत आहे. तथापि, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत अंमलबजावणी करण्यात येत असलेल्या योजनांची कामे प्रलंबित नाहीत.
(२) हे खरे नाही.
(३) महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा सन १९९९, २००४, २००७, २०१३ व २०१४ अन्वये, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील गट-अ संवर्गाची ७६ पदे व गट-ब संवर्गाची ३७५ पदे भरण्यात आली आहेत.

सन २०२३ पर्यंत गट-क संवर्गातील अनुकंपा भरती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात आलेली आहे.

नवीन आकृतीबंधानुसार बाह्ययंत्रणेव्दारे १२०७ पदे भरती करण्याबाबत महाराष्ट्र्र जीवन प्राधिकरणाकडून क्षेत्रिय कार्यालयास सूचना देण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा-२०२३ अन्वये उप अभियंता (स्थापत्य) या पदावर नेमणूकीकरीता १०९ व सहायक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य) या पदावर ४९ उमेदवारांची शिफारस करण्यात आली होती. त्यानुषंगाने सदर उमेदवारांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या राज्यातील विविध कार्यालयामध्ये नियुक्ती देण्यात आली आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील सरळसेवेच्या कोट्यातील २९० पदे शासनाने निर्धारीत केलेल्या संस्थेकडून भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील १२ औद्योगिक क्षेत्रांसाठी स्वतंत्र औद्योगिक धोरण तयार करुन अंमलबजावणी करणेबाबत

**(७) ४८०६ (१४-१२-२०२५) श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी उद्योग एरोस्पेस, जैव उत्पादन, जैव प्लास्टिक, मेडिटेक, बाबू, चामडेरहित वस्तू, वस्त्र प्रावरणे, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (एमएसएमई), डेटा सेंटर,

माहिती तंत्रज्ञान, ॲग्रीटेक इत्यादी १२ क्षेत्रांसाठी स्वतंत्र धोरणे तयार करून त्यांची तीन महिन्यांत अंमलबजावणी करण्याची राज्य शासनाने घोषणा केली असल्याचे माहे ऑक्टोबर २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उद्योग आणि कामगार विभागाशी संबंधित सुमारे २० कायद्यांचा अभ्यास करून त्यातील ५०० तरतूदी शिथिल केल्यामुळे राज्यात सुमारे सव्वा दोन लाख कोटींच्या गुंतवणुकीचे करार झाले आहेत आणि या गुंतवणुकीपैकी सुमारे १०% गुंतवणूक नाशिकमध्ये होणार आहे. हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर धोरणांची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२०-०४-२०२६) :** (१) उद्योग विभागाने राज्याच्या औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी ॲनिमेशन, विज्युअल इफेक्टस गेमिंग कॉमिक्स-एक्सटेंडेड रिआलिटी (AVGC-XR) धोरण-२०२५, जागतिक क्षमता केंद्र (GCC) धोरण-२०२५, महाराष्ट्र रत्ने व आभूषणे धोरण-२०२५, बांबू उद्योग धोरण-२०२५ तसेच महाराष्ट्र उद्योग, गुंतवणूक व सेवा धोरण-२०२५ ही धोरणे नुकतेच जाहीर केलेली आहेत.

माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण-२०२३ हे दिनांक २७/०६/२०२३ च्या शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात आले आहे.

उद्योग विभागाकडून वस्त्र व पोशाख (Readymade Garment and Apparel) धोरण, लेदर, नॉन लेदर, फूटवेअर, ॲपरेल आणि ॲक्सेसरी धोरण तसेच फार्मास्युटीकल, बायोटेक आणि मेडिकल डिव्हासेस धोरण या धोरणांच्या अनुषंगाने मंत्रिमंडळ प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.

याशिवाय इलेक्ट्रॉनिक्स आणि फॅब धोरण, अवकाश, संरक्षण, अवकाश तंत्रज्ञान धोरण, सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम (MSME) धोरण, चक्रीय अर्थव्यवस्था (Circular Economy) धोरण, बायोप्लास्टीक धोरण तसेच ॲग्रीटेक धोरण या धोरणांचा मसुदा अंतिम करण्याची कार्यवाही विभागस्तरावर सुरु आहे.
(२) व (३) व्यवसाय सुलभता वाढविण्यासाठी राज्य शासनाने उद्योग व व्यावसायिक संस्थांवरील किरकोळ उल्लंघनांसाठी असलेल्या कारावासाच्या कायदे व त्यांच्या तरतुदींचे पुनरावलोकन करुन त्या कमी करणे किंवा दंडात्मक पर्याय उपलब्ध करणे या उद्देशाने निर्गुन्हेगारीकरण (Reducing Regulatory Compliance Burden) हे व्यापक उपक्रम राबविण्यात येत आहे. निर्गुन्हेगारीकरण समितीने केलेल्या शिफारशीनुसार १३८ तरतुदींचे निर्गुन्हेगारीकरण करण्यात आले आहे.

राज्य शासनाने विश्वासाधारित सुशासनाला प्रोत्साहन देण्यासाठी व राज्य कायद्यांतील अनावश्यक फौजदारी दंड कमी करण्याच्या उद्देशाने “महाराष्ट्र जनविश्वास (तरतुदींचे सुधारणा) अधिनियम, २०२५” लागू केला आहे.

जिल्हा गुंतवणूक परिषदांच्या माध्यमातून नाशिक जिल्ह्यात सन २०२४ मध्ये १६८ घटकांसमवेत सामंजस्य करार करण्यात आले असून त्यातून रुपये १२३५१.०३ कोटी गुंतवणूक व १९४२५ इतकी रोजगार निर्मिती अपेक्षित आहे तर सन २०२५ मध्ये १४२ घटकांसमवेत सामंजस्य करार करण्यात आले असून त्यातून रुपये ६४०४.१३ कोटी गुंतवणूक व १४४०३ इतकी रोजगार निर्मिती अपेक्षित आहे.

महाराष्ट्र उद्योग, गुंतवणूक व सेवा धोरण-२०२५ हे धोरण नुकतेच जाहीर झालेले असून सदर धोरणातील तरतुदीनुसार औद्योगिक गुंतवणूक आकर्षित करण्याकरीता इन्व्हेस्ट महाराष्ट्र या एकसंध डिजीटल व्यासपीठाची निर्मिती करण्यात येत आहे. तसेच सेवाक्षेत्र तसेच एमएसएमई करीता स्वतंत्र आयुक्तालये निर्मिती करण्याची कार्यवाही सुरु आहे. राज्याने मैत्री ऑनलाइन पोर्टलद्वारे विहित वेळेत मंजुरी व परवानग्या आणि तक्रारींचे निवारण सुनिश्चित करण्यासाठी वैधानिक एक खिडकी प्रणाली सुरू केली आहे. गुंतवणूकदारांना सर्व आवश्यक मंजुरी, परवानग्या आणि परवाने मिळविण्यात मदत करण्यासाठी ते नोडल एजन्सी आणि एकल खिडकी प्रणाली म्हणून काम करते. औद्योगिक वाढ, गुंतवणूक सुलभीकरण आणि नियामक कार्यक्षमतेला चालना देऊन सक्षम व्यवसाय वातावरण निर्माण करण्यासाठी व्यवसाय सुलभीकरण, उद्योगांना अधिक लवचिकता, पारदर्शकता आणि अनुपालन निश्चितता सक्षम बनविण्याकरीता सुधारणा करण्यात येत आहेत. नियम व विनियम सोपे करून, कालबध्द आणि ऑनलाइन मंजुरी देऊन, अनुपालनाचा भार आणि व्यवसायिक खर्च कमी करून गुंतवणूकदारांना अनुकूल वातावरण निर्माण करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पत्रकार व वृत्तपत्र विक्रेता यांच्याकरीता स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याबाबत

**(८) ५०३९ (१७-१२-२०२५) श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ असलेल्या पत्रकारांना कल्याण योजना, जाहिराती वितरण, अधिस्विकृती, सन्मान योजनांचे सुलभ आणि पारदर्शक पध्दतीने लाभ मिळावेत आणि सोबतच श्रमिक वृत्तपत्र विक्रेत्यांना सुध्दा पात्रतेनुसार वेळीच न्याय मिळावा, यासाठी पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी वेगवेगळी स्वतंत्र महामंडळे स्थापन करण्याचा निर्णय सन २०२४ मध्ये 'वृत्तपत्र दिना'चे औचित्य साधून शासनाने घेतला आहे, परंतु अद्यापपर्यंत याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी वेगवेगळी स्वतंत्र महामंडळे स्थापन करण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे तसेच सदरहू महामंडळाची कार्यकक्षा व अधिकार यांचे थोडक्यात स्वरूप काय व त्यासाठी किती रुपयांची तरतूद शासनाने केली आहे;

(३) असल्यास, सदरहू महामंडळे अस्तित्वात येण्यास किती कालावधी अपेक्षित आहे व महामंडळ स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर (१२-०३-२०२६) :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) व (३) केंद्र शासनाने सामाजिक सुरक्षा २०२० (Social Security Code, २०२०) दिनांक २९/०९/२०२० रोजी अधिसूचित केली असून, दिनांक २१/११/२०२५ पासून या संहितेची अंमलबजावणी करण्याबाबत अधिसूचना जारी करण्यात आली आहे.

सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० नुसार असंघटित क्षेत्रातील कामगारांकरीता विविध सामाजिक तसेच कल्याणकारी योजना लागू करण्याकरीता कल्याणकारी मंडळ गठीत करण्याची तरतुद करण्यात आलेली असून, या संहितेमधील "असंघटीत कामगार" या व्याख्येनुसार पात्र होणारे पत्रकार (Journalist) व वृत्तपत्र विक्रेता (Newspaper Vendor) या व्यवसायात काम करणारे कामगार देखील सदरहू मंडळांतर्गत लाभघेण्यास पात्र असणार आहेत.

सद्य:स्थितीत सामाजिक सुरक्षा संहितेमध्ये, राज्याचे नियम प्रसिध्द करण्याची कार्यवाही शासनस्तरावर चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील सर्व अंगणवाड्यांना स्वतंत्र इमारत व सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(९) ६५९८ (१७-०३-२०२६) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण सरनाईक, श्री.सचिन अहिर, डॉ.परिणय फुके, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.संजय खोडके, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने, श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत ग्रामीण, आदिवासी व नागरी भागात १ लाख १० हजार ६६४ अंगणवाडी केंद्रांना मान्यता देण्यात आली असून त्यापैकी २२ हजार ७४३ अंगणवाडी केंद्रे भाड्याच्या इमारतीत चालविली जात आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ७ हजार ९९९ केंद्रे शाळांच्या इमारतीत तर ७ हजार ५११ केंद्रे समाजमंदिर, ग्रामपंचायत इमारतीत व इतर ठिकाणी सुरु असल्याचे आढळून आल्या असून सोलापूर जिल्ह्यात मंजूर असलेल्या एकूण ४५७५ अंगणवाड्यांपैकी १३१४ अंगणवाड्यांना स्वतंत्र इमारत नसून, त्या समाजमंदिर, ग्रामपंचायत इमारत किंवा भाड्याच्या जागेत चालवल्या जात असून राज्यातील नागपूर, सोलापूर, गडचिरोली, बुलढाणा जिल्ह्यांमध्ये मोठ्या संख्येने अंगणवाडी केंद्रे भाड्याच्या इमारतींमध्ये कार्यरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय, असल्यास जिल्ह्यात स्वमालकीच्या इमारती नसलेल्या अंगणवाड्यांसाठी शासनाने आतापर्यंत किती नवीन अंगणवाडी इमारतींना प्रशासकीय व आर्थिक मान्यता दिली आहे तसेच त्यासाठी किती निधी मंजूर व वितरित करण्यात आला आहे,

(३) असल्यास, महिला व बालविकास विभागाच्या ३१ जानेवारी, २०२२ च्या शासन निर्णयानुसार, जिल्हा वार्षिक योजनेतून महिला व बाल सशक्तीकरणासाठी किमान ३ टक्के निधी राखीव ठेवण्यात आला असून यातून अंगणवाडीचे बांधकाम व दुरुस्ती केली जाते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील सर्व अंगणवाडी केंद्रे भाड्याच्या इमारतीत न चालविता स्वमालकीच्या इमारतीत चालविण्याच्यादृष्टीने तसेच तिथे शौचालय तसेच पिण्याच्या पाण्याची सोय व इतर भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (२५-०५-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

राज्यातील नागपूर, सोलापूर, गडचिरोली, बुलढाणा जिल्ह्यांतील अंगणवाडी केंद्र इमारतीची सद्य:स्थिती पुढीलप्रमाणे:-

| जिल्ह्याचे नाव | कार्यान्वित अंगणवाडी केंद्र | स्वमालकीच्या इमारतीमध्ये कार्यान्वित अंगणवाडी केंद्र | भाड्याच्या इमारतीमध्ये कार्यान्वित | शाळेच्या ठिकाणी कार्यान्वित | इतर ठिकाणी कार्यान्वित |
|---|---|---|---|---|---|
| बुलढाणा | २९६९ | १७८७ | ३१८ | ५६६ | २९८ |
| गडचिरोली | २४०२ | १७४० | ५७१ | ५६ | ३५ |
| सोलापूर | ४७३५ | २८३० | ५४३ | ५९१ | ७७१ |
| नागपूर | ३४०४ | २०४१ | १११५ | १८६ | ६२ |

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत महिला व बालविकासकरीता किमान ३ टक्के इतका निधी कायमस्वरुपी राखीव ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे. याशिवाय डोंगरी विकास कार्यक्रम, जिल्हा खनिज प्रतिष्ठाण अंतर्गत देखील अंगणवाडी बांधकामाचे प्रावधान आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात बुलढाणा जिल्ह्यामध्ये-५१, गडचिरोली जिल्ह्यामध्ये-९२, सोलापूर जिल्ह्यामध्ये-३९ व नागपूर जिल्ह्यामध्ये-११३ याप्रमाणे नवीन अंगणवाडी बांधकामे मंजूर करण्यात आली आहेत.

(३) हे खरे आहे.

(४) राज्यात ज्या अंगणवाडी केंद्रांना बांधकामासाठी जागा उपलब्ध आहेत, अशा ठिकाणी जिल्हा स्तरावर विविध योजनांतून अंगणवाडी केंद्रांना स्वमालकीची इमारत बांधकामे करण्यात येतात. त्याचप्रमाणे अंगणवाडी केंद्रांना शौचालय सुविधा उपलब्ध करण्याच्या अनुषंगाने राज्यातील ज्या स्वमालकीच्या अंगणवाडी केंद्रांना शौचालय सुविधा उपलब्ध नव्हती अशा एकूण ९६६४ अंगणवाडी केंद्रांमध्ये शौचालय सुविधा उपलब्ध करण्यास मान्यता देण्यात आली तसेच पिण्याच्या पाण्याची सुविधा नसलेल्या १७२५४ अंगणवाडी केंद्रांना पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करणेसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक जिल्ह्यात प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांकरिता १५ व्या वित्त आयोगातून निधी मंजूर करण्याबाबत

**(१०) ६६०४ (१७-०३-२०२६) श्री.पंकज भुजबळ, श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात चिचोंडी,धामनगांव आणि खेडलेझुंगे येथे प्राथमिक आरोग्य केंद्र तर शिरसगाव लौकी, उंदीरवाडी, कूसमाडी आणि अंगुलगांव येथील आरोग्य उपकेंद्रासाठी अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांनी दिनांक १० मार्च, २०२५ रोजीच्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नाशिक यांना १५ व्या वित्त आयोगतंर्गत बांधकामे मंजूर झाली असल्याचे कळविले आहे,

हे खरे आहे काय,,
(२) असल्यास, आरोग्य संस्थांचा बांधकामासाठी १५ व्या वित्त आयोगातून निधी मंजूर असल्यामुळे या आरोग्य संस्था स्थापन करण्याकरीता विशेष बाब म्हणून मंजूरी देण्याची लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्यासुमारास मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांचेकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नाशिक जिल्ह्यातील इमारत बांधकामासाठी निधी मंजूर असलेल्या आरोग्य संस्था स्थापन करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (०१-०६-२०२६) :** (१) होय.

मौ. धामणगाव, मौ. चिंचोडी, ता.येवला या ठिकाणी नविन प्राथमिक आरोग्य केंद्र १५ व्या वित्त आयोगातून मंजूर आहे.
(२) होय.
(३) मा.सहसंचालक, आरोग्य सेवा, (प्रा.आ केंद्र /उप केंद्र/दवाखाने) मुंबई यांना प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यात मंजूर करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यात मंजूर झाल्यानंतर सदर कामे हाती घेण्यात येतील.
(४) प्रश्न उदभवत नाही

---

## राज्यातील महानगरांव्यतिरिक्त इतर शहरांमध्ये शासन वित्तपोषित सर्वसमावेशक कर्करोग उपचार केंद्रे स्थापन करण्याबाबत

**(११) ६७७१ (१७-०३-२०२६) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देशासह राज्यामध्ये सद्य:स्थितीत कर्करोगामुळे मृत्यूचे प्रमाण कमालीचे वाढत असून मुंबई, पुणे यांसारख्या शहरांमध्ये उत्कृष्ट कर्करोग उपचार सुविधा उपलब्ध असल्या तरी, राज्यातील इतर वर्ग-२ शहरांमध्ये, निमशहरात आणि ग्रामीण भागातील लोकांसाठी आरोग्यसेवांमध्ये कर्करोगांसारख्या मोठ्या आजारांवर आवश्यक असलेली यंत्रणा उपलब्ध नसल्याने रुग्णांना खाजगी रुग्णालयात महागडे उपचार घ्यावे लागत असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील वर्ग-२ शहरांमध्ये शासन वित्तपोषित सर्वसमावेशक कॅन्सर केंद्रे स्थापन करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२४-०४-२०२६) :** (१) व (२) राज्यातील जनतेस सर्वसमावेशक कर्करोग सेवा उपलब्ध करुन देण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक १६/१०/२०२५ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

सदर निर्णयान्वये छत्रपती संभाजीनगर, चंद्रपूर, नागपूर, मुंबई (जे. जे.), कोल्हापूर, पुणे (बैरामजी

जिजीभॉय शासकीय वैद्यकीय महाविद्यालय), नांदेड तसेच नाशिक व अमरावती अशी एकूण ९ केंद्रे ही L२ स्तर म्हणून व अंबाजोगाई (बीड), यवतमाळ, मुंबई (कामा व आल्ब्लेस रुग्णालय), सातारा, बारामती, जळगाव व रत्नागिरी, ठाणे (जिल्हा रुग्णालय संलग्नित) व शिर्डी संस्थानचे रुग्णालय अशी एकूण ९ केंद्रे L३ स्तर म्हणून स्थापन करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

## राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील वैद्यकीय अधिकारी यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

**(१२) ६८०५ (१७-०३-२०२६) श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषध द्रव्ये विभागांतर्गत महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राज्य शासनाच्या विविध महाविद्यालये व रुग्णालयामध्ये वैद्यकीय अधिकारी (गट-ब) या पदावर ४२७ पदांना मंजूरी प्रदान करुन भरण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वैद्यकीय अधिकाऱ्यांसाठी पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या धर्तीवर जागा राखीव ठेवण्याबाबत धोरण ठरविण्यात आले आहे काय,
(३) असल्यास, वैद्यकीय शिक्षण व औषध द्रव्ये विभागांतर्गत भरती केलेल्या वैद्यकीय अधिकारी (गट-ब) यांना व्यवसायरोध भत्ता देण्याबाबत नियमाप्रमाणे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१४-०५-२०२६) :** (१) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागांतर्गत शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांच्या अधिनस्त वैद्यकीय अधिकारी (गट-ब) या संवर्गात एकूण ६०८ पदे मंजूर आहेत.

सदर पदांपैकी रिक्त असलेल्या २९७ पदांकरीताचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले आहे. त्यानुसार भरती प्रक्रिया राबविण्याबाबतची कार्यवाही आयोगाच्या स्तरावर सुरु आहे.
(२) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागांतर्गत वैद्यकीय अधिकाऱ्यांसाठी पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी कोटा राखीव ठेवण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) वैद्यकीय अधिकारी (गट-ब) यांना व्यवसायरोध भत्ता देण्याच्या प्रस्तावाबाबत वित्त विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

## साकेगाव (ता.भुसावळ, जि.जळगाव) येथील ग्रामपंचायतीमध्ये १५ व्या वित्त आयोग निधी वाटपात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(१३) ७३०९ (१७-०३-२०२६) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साकेगाव (ता.भुसावळ, जि.जळगाव) ग्रामपंचायतीच्या १५ व्या वित्त आयोग निधीत सन २०१६-१७ ते २०२०-२१ या कालावधीत झालेल्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता आणि गैरव्यवहार झालेला असून रुपये ३५,२३,०१४/- वसुली संदर्भात दिनांक २७ ऑगस्ट, २०२० रोजी वा त्यादरम्यान उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जळगाव यांनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.जळगांव, यांच्याकडे चौकशी अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केलेली आहे काय असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (०१-०६-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) संबंधित ग्रामविकास अधिकारी श्री.गौतम आधार वाडे, यांना दिनांक २/१२/२०२० रोजी निलंबित करण्यात आलेले आहे व त्यानंतर त्यांचे विरूध्द विभागीय चौकशीची कार्यवाही पूर्ण करून जिल्हा परिषद, जळगाव कडील आदेश दिनांक ७/०५/२०२१ अन्वये त्यांना महाराष्ट्र जिल्हा परिषद सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४(१) नुसार समज देणे ही शिक्षा करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उदभवत नाही.

---

## पूर्व विदर्भातील अनेक जिल्ह्यांतील माजी मालगुजारी तलावांशेजारील अतिक्रमणे दूर करुन तलावांचे पुनरुज्जीवन करण्याबाबत

**(१४) ७३३० (१७-०३-२०२६) श्री.अमित गोरखे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भातील गोंदिया, भंडारा आणि इतर जिल्ह्यात असणारे हजारो माजी मालगुजारी तलवात अतिक्रमणे झाली असून गोंदिया जिल्ह्यात १४२१ तलावातील अतिक्रमणामुळे तलावाची पाणी साठवण क्षमता कमी झाली असून या परिसरातील शेती व जनावरांना पुरेसे पाणी उपलब्ध होत नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विदर्भातील सर्व माजी मालगुजारी तलावांचे पुनर्जीवन आणि सिंचन व्यवस्था शाश्वत करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड (०३-०६-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) शासन निर्णय दिनांक ११ ऑक्टोबर २०२३ अन्वये माजी मालगुजारी तलावांचे पुनरुज्जीवन व दुरुस्ती कार्यक्रम राबविण्यात येत असून सदर कार्यक्रमांतर्गत नागपूर, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली जिल्ह्यातील एकूण १०४९ मा.मा.तलाव दुरुस्ती कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. तलावामध्ये तलावाची पाळीची दुरुस्ती, विमोचक सांडवा दुरुस्ती, खोलीकरण इत्यादी बाबींचा समावेश आहे. एकूण ६०४९ मा.मा.तलावांपैकी अतिक्रमण झालेल्या तलावांची संख्या १९३८ व त्यावर झालेले अतिक्रमण निकाली काढण्याची कार्यवाही सुरु आहे.

गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार अंतर्गत तलाव खोलीकरण करण्यात येते. सदर दुरुस्तीमुळे तलावांचे पुनरुज्जीवन आणि सिंचन व्यवस्था शाश्वत ठेवण्यास मदत होईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे विभागातंर्गत जिल्हा परिषदेतील वर्ग-३ संवर्गातील कर्मचाऱ्यांची पदोन्नती प्रक्रिया प्रलंबित असल्याबाबत

**(१५) ७६४३ (१७-०३-२०२६) श्री.अमित गोरखे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे विभागातील जिल्हा परिषदेतील वरिष्ठ सहाय्यक लिपिक सहाय्यक पदाच्या सन २०२३ पासून परीक्षा झाल्या नसल्याने पुणे विभागातील सांगली, सातारा, कोल्हापूर, पुणे जिल्ह्यातील सदर रिक्त पदे भरलेली नसल्यामुळे येथील कनिष्ठ पदावरील लिपिकांवर अन्याय होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सांगली जिल्हा परिषदेच्या लिपिकांच्या खात्यातंर्गत सन २०२३ पासून परीक्षा झाल्या नसल्याने पदोन्नती प्रलंबित राहिल्यामुळे यासंदर्भात जिल्हा परिषद लिपिक वर्गीय कर्मचारी संघटनेने पुणे विभागीय आयुक्तांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे जिल्हा परिषदांच्या वर्ग तीनच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीमध्ये व कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीमध्येही अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पुणे विभागातील जिल्हा परिषदांमध्ये कर्मचाऱ्यांच्या अडचणी सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (२५-०३-२०२६) :** (१), (२) व (३) जिल्हा परिषदेतील कनिष्ठ सहाय्यक (लिपिक) पदावरील कर्मचाऱ्यांना २५ टक्के कोट्यानुसार वरिष्ठ सहाय्यक (लिपिक) पदावर निवडीने भरण्यासाठी असलेली मर्यादित स्पर्धात्मक विभागीय परीक्षा सन २०२३ मध्ये विभागीय कार्यालय, पुणे यांचेकडून घेण्यात आली होती व सदर परीक्षेमध्ये गुणवत्तेनुसार निवड झालेल्या कनिष्ठ सहाय्यक यांना वरिष्ठ सहाय्यक पदी निवडीने पदस्थापना देण्यात आली आहे. सन २०२३ नंतर पुढील कालावधीत परीक्षा न झाल्यामुळे पदे रिक्त आहेत. याबाबत लिपिकवर्गीय संघटनेचे दिनांक २६/१२/२०२५ रोजीचे निवेदन पुणे विभागीय आयुक्तांना प्राप्त झालेले आहे.
(४) सदरची रिक्त पदे भरणेच्या अनुषंगाने रिक्त पदांचा तपशील जिल्हा परिषदांकडून घेण्यात आला आहे. जिल्हानिहाय वरिष्ठ सहाय्यक (लिपिक) स्पर्धा परिक्षेची रिक्त पदांची बिंदुनामावली तपासून घेणेकामी सहाय्यक आयुक्त (मा.व क.), पुणे विभाग, पुणे यांना कळविण्यात आले आहे. पदोन्नतीमध्ये दिव्यांग आरक्षण वगळून इतर कोणतीही पदोन्नतीची बिंदुनामावली तपासून देऊ नये अशा सूचना प्रशिक्षणामध्ये सहाय्यक आयुक्त (मा.व.क.) यांना प्राप्त असल्याने, त्यांचेकडून वरिष्ठ सहाय्यक (लिपिक) संवर्गाच्या बिंदुनामावली नोंदवही पडताळणीबाबत सामान्य प्रशासन विभागाचे मार्गदर्शन मागविण्यात आले आहे. सदर मार्गदर्शन अद्याप अप्राप्त असल्यामुळे रिक्त पदे भरणेकामी मर्यादित स्पर्धात्मक विभागीय परीक्षा

आयोजित करता आलेली नाही. सहाय्यक आयुक्त (मा.व.क.), पुणे यांचेकडून बिंदुनामावली तपासणी करुन मिळताच विभागीय स्पर्धा परीक्षा आयोजित करुन रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आलीयाबाद (ता.जि.अमरावती) येथील प्रस्तावित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या इमारतीची जागा बदलण्याबाबत

**(१६) ७६८६ (१७-०३-२०२६) श्री.संजय खोडके :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याबाबत दिनांक १३ जुलै २०२३ रोजी घेतलेल्या निर्णयानूसार मौजे आलीयाबाद ता.जि.अमरावती येथे निश्चित केलेली जागा ही शहरापासून १२ कि.मी अंतरावर असल्याने सामान्य व गरजू रुग्णांना तसेच मेळघाटातील अतिदुर्गम व कुपोषीत भागातील रुग्णांना तेथे उपचारार्थ जाताना अत्यंत आर्थिक त्रास व कालापव्यय होणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी रुग्णाच्या दृष्टीने कृषी विद्यापीठाची जागा सोयीस्कर असल्याने मौजे आलीयाबाद येथील जागा बदलून कृषी विद्यापीठाची जागा वैद्यकीय महाविद्यालयासाठी तात्काळ देण्यासाठी मा.मुख्यमंत्री व मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री यांचेकडे प्रस्ताव दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१७-०४-२०२६) :** (१) अमरावती जिल्ह्यातील अमरावती, धामनगाव रेल्वे, चांदुर रेल्वे, नांदगांव खंडेश्वर, भातकुली, वरुड, मोर्शी व तिवसा ह्या तालुक्यामधून येणाऱ्या रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अमरावती साठी निश्चित केलेल्या मौजे आलीयाबाद या ठिकाणी पोहोचण्याकरीता सोयीचा रस्ता उपलब्ध आहे.
(२) हे खरे आहे.
(३) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अमरावती साठी निश्चित करण्यात आलेल्या जागेवर महाविद्यालय व रुग्णालयाच्या बांधकामाकरीता प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार म्हणून मे.राईट्स लि. यांची नियुक्ती करण्यात आली असून बांधकामासाठी कंत्राटदाराची नियुक्ती करण्याबाबत निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात उद्योग भवन स्थापन करण्याबाबत

**(१७) ८३४९ (१७-०३-२०२६) श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य शासनाने स्थानिक उद्योजकांना चालना देण्यासाठी आणि व्यवसायासाठी सुलभ वातावरण (Ease of Doing Business) निर्माण करण्याच्या उद्देशाने उद्योजकांसाठी सर्व समावेशक सेवा देणारे वनस्टॉप सोल्युशन देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात ‘उद्योग भवन’ स्थापन करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भवनामध्ये जिल्हा उद्योग केंद्र (DIC) आणि इतर संबंधित विभागांच्या सेवा एकत्रित केल्या जाऊन या निर्णयानुसार नव्याने उद्योग स्थापन्यासाठी आवश्यक परवाने, मंजूरी, सल्ला आणि आधुनिक सुविधाकरीता विविध कार्यालयांत फेऱ्या मारण्याची गरज कमी होईल. तसेच नवीन उद्योगांना प्रोत्साहन, मार्गदर्शन आणि तांत्रिक मदत दिली जाईल, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रत्येक जिल्ह्यात उद्योजकांसाठी सर्व समावेशक सेवा देणारे वनस्टॉप सोल्युशन देण्यासाठी उद्योग भवनाची स्थापना करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२०-०४-२०२६) :** (१) होय हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) नवीन उद्योग भवन उभारणीच्या अनुषंगाने जिल्हयांत एकाच ठिकाणी उद्योग संबंधित सर्व समावेशक कार्यालयाकडून मिळणारे परवाने उद्योग भवनाच्या माध्यमातून मिळण्यास सुकर होईल. तसेच जिल्ह्यातील उद्योजकांची वेळेची बचत होवून औद्योगिक विकासासाठी चालना मिळू शकेल. अशा सुविधा देण्याचा शासनाचा उद्देश आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सह्याद्री नगर, चारकोप, कांदिवली (पश्चिम) मुंबई येथील कापड बाजार आणि दुकाने मंडळातील नोंदणीकृत माथाडी व हातगाडी कामगारांना हक्काची घरे बांधून देण्याबाबत

**(१८) ८४०० (१७-०२-२०२६) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सह्याद्री नगर, चारकोप, कांदिवली (पश्चिम) मुंबई येथे सात एकर मोकळया भूखंडावर कापड बाजार आणि दुकाने मंडळातील (Cloth Markets and Shops Board) नोंदणीकृत ३३१३ माथाडी, हातगाडी कामगार मागील पंचवीस वर्षापासून हक्काची घरे बांधून देण्याकरीता लढा देत असून यासंदर्भात त्यांनी मा.कामगार मंत्री महोदयांना वारंवार निवेदन देऊनही अद्यापपर्यंत या मागण्यांवर कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईतील माथाडी कामगारांनी आपल्या हक्काच्या घरांसाठी सातत्याने आंदोलने केली असून युनियनमधील वाद आणि जागा निश्चितीच्या समस्यांमुळे हजारो कामगारांची घरे अनेक वर्षांपासून रखडली असून मुंबई कापड बाजारातील नोंदीत माथाडी कामगारांना हक्काची घरे देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर (०४-०३-२०२६) :** (१) प्रस्तुत प्रकरणी शासनास वेळोवेळी संघटनांची निवेदने प्राप्त झालेली आहेत, हे खरे आहे.

(२) महसूल व वन विभागाने दिनांक ३०/०८/१९७७ च्या ज्ञापनान्वये कापड बाजार मंडळातील काम करणाऱ्या नोंदीत माथाडी कामगारांकरीता गृहसंकल्प बांधण्यासाठी सुमारे २७ एकर ३४ गुंठे जमीन वितरीत करण्यात आली होती. परंतु विविध प्रशासकीय व तांत्रिक अडचणी तसेच न्यायिक प्रकरणांमुळे सदरहु प्रकल्प पूर्ण होण्यास विलंब झाला होता, हे खरे आहे.

या जमिनीपैकी सुमारे २० एकर ३४ गुंठे जमिनीवर ३२ इमारती कापड बाजार आणि दुकाने मंडळामार्फत बांधण्यात आलेल्या असून, त्यामध्ये एकूण २१५४ सदनिका आहेत. उर्वरित ७ एकर जागेवरील बांधकाम अद्याप प्रलंबित होते.

एकूण ३२ इमारती पैकी ११ इमारती माथाडी कामगारांच्या विशाल सह्याद्री को.ऑप.हौ.सो. संस्थेच्या ताब्यात दिलेल्या होत्या. एकूण ३२ इमारतीत सुमारे २०७० माथाडी सदस्यांना सदनिका वितरीत करण्यात आलेल्या आहेत. उर्वरित सदस्यांनी वेळोवेळी सदनिका मिळण्याबाबत विनंती केलेली आहे.

दरम्यानच्या कालावधीत दिनांक १४/१०/२०२४ च्या ज्ञापनान्वये महसूल व वन विभागाने कापड बाजार व दुकाने मंडळास भाडेपट्टयाने दिलेली जमीन व इमारती मे. विशाल सह्याद्री को.ऑप.हौ.सो. यांना वर्ग/ हस्तांतरीत करण्यास व कापड बाजार व दुकाने मंडळाकडून हस्तांतरित होणाऱ्या ९९,११६ चौ.मी. जमीनीपैकी बांधकाम न झालेले सुमारे २६, ९०० चौ.मी. क्षेत्र वगळुन उर्वरीत ७२,२१६ चौ.मी. क्षेत्र शासनाच्या प्रचलित धोरणानुसार सदर संस्थेस भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करुन देण्यास मान्यता दिलेली असून त्यानुसार जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक १४/११/२०२४ रोजी आदेश निर्गमित करुन पुढील कार्यवाही केलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील सिटीस्कॅन रुग्ण तपासणीकरीता करार केलेल्या खाजगी कंपनीचे थकित मानधन अदा करण्याबाबत

**(१९) ८४०३ (२०-०२-२०२६) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर सार्वजनिक आरोग्य विभाग व कृष्णा डायग्नोस्टिक लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने सार्वजनिक-खाजगी भागीदारी (Public-Private Partnership - PPP) तत्त्वावर सिटीस्कॅन तपासणी केंद्रे राज्यातील जिल्हा रुग्णालय व उपजिल्हा रुग्णालयात वर्षभरापूर्वी सुरू केली आहेत परंतु मागील वर्षभरात शासनाकडे ५० कोटी रुपये थकीत असल्याने उक्त या कंपनीने कोणतीही सूचना न देता उक्त सेवा केंद्रे बंद केल्यामुळे रुग्णांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्य विभागाने या खाजगी कंपनीशी करार करताना सिटीस्कॅन रुग्ण तपासणी आणि तांत्रिक बाबींची जबाबदारी कंपनीवर सोपविताना त्यासाठी दर निश्चित केले असतानाही कंपनीसोबत केलेल्या कराराचे पालन न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, राज्यातील सर्व जिल्हा रुग्णालय व उपजिल्हा रुग्णालयात सार्वजनिक-खाजगी भागीदारी (Public-Private Partnership - PPP) तत्त्वावर सुरु करण्यात आलेले सिटीस्कॅन तपासणी केंद्रांचे

थकित देयके अदा करून सदर केंद्रे पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर (०२-०३-२०२६) :** (१), (२) व (३) राज्यात CT Scan सुविधा सार्वजनिक आरोग्य विभागाच्या रुग्णालयात सुरू करण्यासाठी PPP चा करार कृष्णा डायग्नोस्टिक सोबत करण्यात आला आहे. सदर सेवेचे देयके राष्ट्रीय आरोग्य अभियानामार्फत अदा करण्यात येते. काही ठिकाणी टाळता येण्याजोगे CT Scan करण्यात आले असे दिसून आले त्यामुळे अनावश्यक रित्या CT Scan काढण्यात येऊ नये आणि वित्तीय भार अनावश्यक रित्या वाढू नये यासाठी जिल्ह्यांना फक्त आवश्यकता आहे अशा वेळीच CT Scan करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. त्या अनुषंगाने सुविधेत सुसूत्रता आली आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत उपलब्ध अनुदानानुसार नियमीतपणे देयके कृष्णा डायग्नोस्टिक याना अदा करण्यात येतात. परंतु अनुदान उपलब्ध होण्यास विलंब झाल्यास तात्पुरता विलंब होवू शकतो.

मात्र राज्यातील रुग्णालयात सेवा नियमितपणे सुरू असून लातूर जिल्ह्यात डिसेंबर, २०२५ मध्ये ५२२ CT Scan करण्यात आले आहे.

शासन सदर सी.टी. स्कॅन सेवांबाबत आढावा घेत आहे आणि या सुविधा रुग्णांच्या दृष्टीने अधिक प्रभावी होण्याच्या दृष्टिकोनातून योग्य त्या सुधारणा करीत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चिंचोडी (ता.येवला, जि.नाशिक) येथील औद्योगिक वसाहत कार्यान्वित करुन स्थानिकांना रोजगार देण्याबाबत

**(२०) ८४०४ (२०-०२-२०२६) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिंचोडी (ता.येवला, जि.नाशिक) येथे एमआयडीसी (MIDC) स्थापन करण्यात आली असली तरी पायाभूत सुविधांचा अभाव, अपुरे पाणी, रस्ते आणि जागेच्या समस्यांमुळे तिथे अद्याप औद्योगिक विकास झालेला नसून अनेक वर्षे उलटूनही उद्योग सुरू न झाल्याने येथील स्थानिक रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येवला तालुक्यात उद्योग येऊन स्थानिकांना रोजगार मिळेल यासाठी येथील शेतकऱ्यांनी शेकडो हेक्टर शेतजमिनी औद्योगिक वसाहतीकरीता दिल्या असता दोन वर्षाचा कालावधी होऊनही अद्याप औद्योगिक वसाहत सुरू झाली नसल्याने येथील बेरोजगारांना रोजगारांसाठी भटकंती करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चिंचोडी (ता.येवला, जि.नाशिक) येथील औद्योगिक वसाहतीचा (MIDC) विकास पूर्ण क्षमतेने करुन येथील स्थानिकांचा रोजगार प्रश्न कायमस्वरुपी मार्गी लावण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (०९-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

मौजे चिंचोडी (खुर्द (तालुका येवला, जि.नाशिक येथील एकूण १०९.३४ हेक्टर आर क्षेत्र महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या ताब्यात आलेले असून औद्योगिक क्षेत्रात एकूण १६१ भूखंड पाडण्यात आलेले आहेत. पहिल्या टप्प्यातील ७७ भुखंडांपैकी २४ भुखंडांचे वाटप झालेले आहे. महामंडळातर्फे येवला औद्योगिक क्षेत्र टप्याटप्याने विकसित करण्यात येत आहे. येवला औद्योगिक क्षेत्रातील टप्पा क्रं. १ मध्ये ५५ हेक्टर क्षेत्रावर पायाभुत सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत.

त्याचप्रमाणे नांदूर माध्यमेश्वर धरणापासून विंचूर येथील जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत पाणी आणणे व पुढे येवला पर्यंत पाणीपुरवठ्यासाठी जलवाहिनी टाकणे इत्यादी कामे अंतिम टप्प्यात आहेत. तसेच विद्युत पुरवठा करण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरू असून निविदा मंजूरीनंतर त्वरित काम हाती घेणे प्रस्तावित आहे.
(२) व (३) वाटप केलेल्या २४ भुखंडधारकांपैकी ३ भूखंड धारकांनी नकाशे मंजुरी घेतली असून यापैकी १ उद्योग घटकाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.